आपल्या मुलाने संप्रदायनिष्ठ, धर्मभीरु, कर्मकाण्डप्रवण असा एक आदर्श ब्राह्मण बनावे, असा करसनजींचा पद्धतशीर प्रयत्न होता. किशोरावस्थेतील दयानंदांचे विचार वेगळ्याच दिशेने जाणार होते. याची त्यांना काहीच कल्पना नव्हती. कदाचित् खुद्द दयानंदांनांही याची स्पष्ट कल्पना नसावी. परंतु अशी एक घटना घडली की, जिने त्यांच्या जीवनाची संपूर्ण दिशाच बदलून टाकली. तसे पाहिले तर ती काही अद्‌भुत किंवा अभूतपूर्ण घटना नव्हती. तुमच्या-आमच्या जीवनात ती नेहमीच घडत असते. पण तिचा आपल्यावर काहीच परिणाम घडत नाही. सामान्य व असामान्य माणसांत हाच तर फरक असतो. जी गोष्ट आपल्या नित्य परिचयाची असते तीच त्यांच्या जीवनात आमुलाग्र परिवर्तन म्हणजेच क्रांती घडवून आणते. अशी ती घटना घडली होती शिवरात्रीच्या दिवशी! त्या रात्रीने दयानंदांच्या जीवनात आणि त्यांच्याद्वारे साऱ्या मानवजातीच्या इतिहासात पहाट फुलविली. त्या घटनेचे वर्णन खुद्द महर्षींच्या शब्दांतच देणे उचित होईल. ते पुण्यामध्ये आपल्या प्रवचनात म्हणतात -

''माझ्या गावी गावाबाहेर एक मोठे देऊळ आहे. तेथे शिवरात्रीच्या दिवशी रात्री पुष्कळ लोक जमतात, पूजाअर्चा करतात. माझे वडीलें मी आणि इतर बरेच लोक तेथे जमलो होतो. पहिल्या प्रहराची पूजा आटोपली. दुसरीही पूजा झाली. मग रात्रीचे बारा वाजून गेल्यावर लोक हळूहळू जागच्या जागी डुलक्या घेऊ लागले. माझ्या वडिलांनाही डुलकी आली. पुजारी बाहेर गेला. माझा उपास निष्फळ होईल, या भीतीने मी निजलो नाही. इतक्यात एक चमत्कार झाला. देवळातल्या बिळातून उंदीर बाहेर आले आणि शंकराच्या पिंडीभोवती फिरु लागले. ते पिंडीवरील अक्षता खाऊ लागले. मी जागा होतो म्हणून तो चमत्कार मला दिसला. आदल्या दिवशी मी शिवरात्रीची कथा ऐकली होती. तिच्यात शिवाचे आक्राळ-विक्राळ गण, त्यांचे पाशुपतास्त्र, त्यांचे वृषभ वाहन व त्याचे अद्‌भूत शौर्य यांविषयी पुष्कळ श्रवण केले होते. म्हणून जेंव्हा मी उंदराची ती लीला पाहिली, तेंव्हा पोरबुद्धीस असे वाटले की, जो शिव आपल्या पाशुपतास्त्राने मोठमोठ्या प्रचंड दैत्यांना मारतो. त्याला एवढे क्षुद्र उंदीर हाकलून देता येत नाही काय? असे अनेक विचार माझ्या मनात आले आणि मी माझ्या वडिलांना जागे करुन विचारले की, 'एवढा प्रतापी शंकर या क्षुद्र उंदरांना का हाकलून लावीत नाही ?' यावर माझे वडील म्हणाले, 'तुझी बुद्धी फार वाईट

आहे. ही फक्त देवाची मूर्ती आहे' तेंव्हा मी मनाशी निश्चय केला की, 'जेंव्हा तो त्रिशूलधारी शंकर मी प्रत्यक्ष पाहीन, तेंव्हाच मी त्याची पूजा करीन. नाही तर करणार नाही.''

मूलशंकर अतिशय अस्वस्थ झाला. कांही दिवसांनी त्याचे चुलते वारले. सख्खी बहीण वारली. तो शोकसागरात बुडाला. त्याच्या मनात विरक्ती निर्माण झाली. त्याचे हे लक्षण पाहुन आई-वडिलांनी त्याचे लग्न करायचे ठरविले. त्याला संसारात गुंतविणे आवश्यक होते. पण मूलशंकर संसाराच्या जाळ्यात अडकू इच्छित नव्हता. बहिणीच्या मृत्यूने तो अतिशय अस्वस्थ झाला. मृत्यूविषयी त्याच्या मनात प्रचंड कुतूहल निर्माण झाले. "मलाही एके दिवशी असेच जावे लागेल" असा विचार त्याच्या मनात पुनः पुन्हा येऊ लागला. नचिकेताप्रमाणे त्याला मृत्यूही जाणून घेणे आवश्यक वाटले.

मूलशंकरची अस्वस्थता व बेचैनी साऱ्यांनाच लक्षात येत होती. एके दिवशी संधी साधून केवळ अंगावरच्या कपड्यानिशी गृहत्याग केला. नंतर तो कधीच परतला नाही. सत्यज्ञानाच्या शोधात अनवाणी पायांनी अनेक वर्षे भटकत राहिला. अनेक साधु-पुरुषांच्या त्याने भेटी घेतल्या. मनातल्या शंका विचारल्या, पण समाधान झाले नाही.

सत्यज्ञानासाठी मूलशंकरने घर सोडले. सर्वस्वाचा त्याग केला. गौतमबुद्धानेही अशाच प्रकारे व अशाच कारणासाठी सर्व प्रकारच्या सुखांना लाथाडून आपला राजवाडा सोडला होता. घर सोडले तेंव्हा मूलशंकरचे वय एकवीस-बावीस वर्षांचें होते. मूलशंकरने खूप भटकंती केली. सत्यज्ञानाच्या प्राप्तीसाठी त्याने चारी दिशा धुंडाळल्या. गुरुचा शोध घेतला. हिमालयात भटकंती केली. मुक्तीचा मार्ग योगी दाखवू शकतील म्हणून मूलशंकरने अनेकांच्या भेटी घेतल्या. पूर्णानंद सरस्वती या महाराष्ट्रीय संन्याशाकडून संन्यास दीक्षाही घेतली. दयानंद सरस्वती हे नाव धारण केले. खूप भटकंती केली. पण समाधान झाले नाही, मथुरेला स्वामी विरजानंदांची भेट घेतली व योग्य गुरु भेटला.

स्वामी विरजानंद, प्रज्ञाचक्षू, प्रकांड पंडित होते. ते साक्षात ऋषी होते. ते अंध होते, पण अज्ञानाच्या अंधारात बुडालेल्या जगाला ज्ञानाचा प्रकाश देण्याचे त्यांच्यात सामर्थ्य होते. वेद व इतर आर्ष ग्रंथांचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता. व्याकरणावर त्यांचा अधिकार होता. आधुनिक काळातील ते पाणिनीच होते. स्वामी दयानंदांची ज्ञानलालसाही तेवढीच प्रचंड होती. स्वामी विरजानंदांनी स्वामी दयानंद सरस्वतींना अनार्ष ग्रंथ यमुनेत

बुड़वायला सांगितले. स्वामी दयानंदांनी सखोल अभ्यास सुरु केला. तेंव्हा ते छत्तीस वर्षाचे होते. संस्कृत भाषेवर त्यांनी अप्रतिम प्रभुत्व मिळविले. संस्कृत भाषेच्या व्याकरणाचा त्यांनी चिकित्सक पद्धतीने सखोल अभ्यास केला. वैदिक आर्ष साहित्यात ते पारंगत झाले. अडीच वर्षानंतर स्वामी दयानंद सरस्वतींनी आपल्या गुरुचा निरोप घेतला. स्वामी विराजानंदांची सेवा त्यांनी श्रद्धेने केली. त्यांचा राग सहन केला; आपल्या गुरुंविषयी कृतज्ञता निर्माण झाली.

विद्या संपादनानंतर स्वामी विरजानंदांचा निरोप घेणे भाग होते. स्वामी दयानंदांनी गुरुवर विरजानंदांना अपार श्रद्धा व कृतज्ञतेने गुरुदक्षिणा म्हणून लवंगा दिल्या. गुरुंनी त्यांना आदेश दिला, "लोकांना सत्यज्ञानाचा प्रकाश दे व देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्रयत्न कर." हा गुरुचा आदेश पालन करण्याचा त्यांनी संकल्प केला. स्वामी दयानंद सरस्वतीचे हे जीवनदान होते. ती त्यांनी गुरुंना दिलेली गुरुदक्षिणा होती. ब्रह्मर्षी विरजानंदांनी स्वामी दयानंदांच्या जीवनाला नवी दिशा दिली; वैदिक ज्ञानभांडाराची चावी दिली. मूर्तिपूजेला वेदांमध्ये आधार नाही. श्राद्ध वेदांविरुद्ध आहे.

ज्ञान आणि दृढनिश्चय या दोनच गोष्टींचा त्यांना आधार होता. त्यांच्या बळावर स्वामी दयानंदांनी धर्मसुधारणा व समाजसुधारणेला हात घातला. स्वामीजींचा आवाज सर्वप्रथम दुमदुमला तो हरिद्वार येथे गंगेच्या काठावर! १८६७ सालची घटना आहे. कुंभमेळा चालू होता. स्वामीजींनी या कुंभमेळ्यात गंगेच्या काठावर **'पाखंड खंडिनी पताका'** रोवली. थंडीचे दिवस. अंगावर कपडे नकोत. संन्यासीच ते. गंगेच्यां काठी उभा राहिला हा निश्चयांचा महामेरु!

स्वामी दयानंदांनी मूर्तिपूजेचे खंडन केले. देव्हाऱ्यातील देव गंगेत बुडवायला त्यांनी सांगितले. ऐकणाऱ्यांच्या मनात खळबळ माजली. स्वामीजींनी पाखंड खंडिनी पताका फडकावली. त्यांनी मुख्यत: दोन प्रश्नांना हात घातला. १) मूर्तिपूजा २) जातिप्रथा. त्यांची त्यांनी तर्ककठोर चिकित्सा केली. निखळ सत्य हे वेदातच आहे. वेद हेच खरे आर्ष ग्रंथ. त्या ग्रंथांमध्ये ना मूर्तिपूजेचे समर्थन आहे, ना.... जन्माधिष्ठित जातिप्रथेचे! सत्यज्ञानाची गंगोत्री वेदातच आहे. सत्य बोलणे व सांगणे हाच असत्यावरचा प्रहार असतो. सत्य व असत्य एकत्र नांदूच शकत नाहीत. सत्याचा प्रकाश लोकांच्या दारापर्यंत नेणे हे स्वामी दयानंदांच्या आयुष्याचे मिशन बनले. त्यांनी आपले सर्व आयुष्य सत्याला अर्पण केले. सत्य शोधण्यासाठी त्यांनी आपली प्रज्ञा पणाला लावली. बहुदेवतावाद बोकाळला होता. अनेक देव-देवतांची मंदिरे देशात

बांधली गेली. तीर्थक्षेत्रांची संख्याही प्रचंड प्रमाणात वाढली होती. तेहतीस कोटी देवदेवतांचा हा देश ! अनिष्ट प्रथा-परंपरांचे जाळे देशभर पसरले होते. प्रत्येक पावलावर कर्मकांड ! त्यात सारा भारतीय समाज अडकला होता.त्याची विचारशक्तीच क्षीण झाली होती. बहुजनांना वं महिलांना शिक्षणाची दारे बंद होती. जातिप्रथेने समाजाला विषारी सापाप्रमाणे विळखा घातला होता. हजारो जाती-पोटजातीमध्ये देश विभागला गेला होता. जातिव्यवस्था जन्माधिष्ठित झाली होती. अस्पृश्यतेला अमानुषी स्वरुप प्राप्त झाले होते. बालविवाह सर्रास होत होते. विधवा-विवाहास बंदी होती. सतीप्रथा बंद पडली नव्हती. पूर्वजन्मीच्या पापाचे हे फळ असा समज दृढ झाला होता. भारतीय समाजाची ही अवस्था जीर्ण वस्त्रासारखी झाली होती.

स्वामी दयांनदांसमोर असा हा दुबळा भारत उभा होता. त्यांच्या अंगात प्राणच नव्हता. राजेरजवाडे इंग्रजांचे गुलाम होते. आपल्या प्रज्ञेविषयी त्यांच्या मनात कसलीच आस नव्हती. स्वदेश व स्वराज्य ! या संकल्पनांनी आकारच घेतला नव्हता. हे चित्र बदलायचे कसे ? आणि कोणी ? या प्रश्नांनी स्वामी दयानंदांना अस्वस्थ केले होते. संबंध देश विषवृक्षाखाली उभा होता. त्यांच्या फांद्यावर घाव घालायचे की मुळांवर? मुळांवर घाव घालणे आवश्यक होते. या वृक्षाच्या फांद्यामध्ये हवेतून विष आलेले होते. ही मूळे म्हणजे अनिष्ट प्रथा-परंपरा, अंधश्रद्धा, अज्ञान, जातिभेद, मूर्तिपूजा, बालविवाह, दैववाद, अवतारवाद वगैरे. झाडावरील फांद्या किंवा जमिनीखालच्या मुळया एकमेकींमध्ये अडकलेल्या होत्या. त्या नष्ट करण्याची आवश्यकता होती. हे आव्हान स्वामी दयानंदांनी आपल्या शिरावर घेतले, आत्मविश्वासाने!

महर्षी स्वामी दयानंदांनी गुण व कर्मावर आधारलेल्या वर्णव्यवस्थेचे समर्थन केले. जन्मावर आधारलेल्या वर्णव्यवस्थेचा त्यांनी विरोध केला. ती त्याज्य ठरविली. जन्माधिष्ठित वर्णव्यवस्थेला वेदांमध्ये कसलाच आधार नाही. स्वामी दयानंदांनी गुणकर्मावर आधारलेल्या वर्णव्यवस्थेचे समर्थन केले. व्यक्तीच्या योग्यतेनुसार तिला समाजात स्थान मिळते. वैदिक काळातील हे तत्त्व मोडीत काढून ती वर्णव्यवस्था जन्माधिष्ठित झाली होती. त्यामुळे जातीभेदाला प्रोत्साहन मिळाले. जन्माधिष्ठित वर्ण व जातिव्यवस्थेने अनेक अरिष्टे व अनार्थांना जन्म दिला. त्यामुळे समाज बंदिस्त बनला. रोटीबंदी, बेटीबंदी, विद्याबंदी, व्यवसायबंदी, प्रवासबंदी अशा बंदीमुळे समाजाला अंधाऱ्या कोठडीचे स्वरुप

प्राप्त झाले. त्यात ना हवा ना प्रकाश ! गुदमरणे मात्र अटळ होते.

महर्षी दयानंद हे चित्र बदलू इच्छित होते आणि म्हणून त्यांनी जातिव्यवस्थेविरुद्ध आवाज़ उठवला. स्वामीजींनी भारतीय समाजाच्या पुनर्रचनेचे कार्य अंगिकारले. हे अतिशय कठीण कार्य. पण हे शिवधनुष्य त्यांनी आत्मविश्वासानें उचलले.

स्वामी दयानंदांजवळ वाणी आणि लेखणी होती. त्यांनी वाणी परजली व लेखणीही. यांच्या पाठिशी कठोर असे तर्कशास्त्रही उभे होते. झंझावाताचे रुप धारण करुन त्यांनी देशात संचार सुरु केला. स्वामीजींनी भारतातल्या पुरोहितशाहीवर कठोर हल्ले चढविले. पुरोहितशाहीतच मूर्तिपूजेचे स्तोम माजविले. जातिप्रथेला खतपाणी घातले. उच्च-नीचता, अंधश्रद्धा, कर्मकांड, मंत्रतंत्र, फलज्योतिष आदी गोष्टींच्या माध्यमातून बहुजनांचे शोषण केले. मूर्तिपूजेचे खंडन पुरोहितांना कसे आवडेल ?

स्वामी दयानंदांचा हा झंझावात संबंध आर्यावर्तात संचरला. अनेक ठिकाणी त्यांचे शास्त्रार्थ हिंदू पंडितांबरोबर झाले, तसेच मुल्ला-मौलवी व ख्रिश्चन पाद्र्यांबरोबरही झाले. शास्त्रार्थाचे शास्त्रच स्वामीजींनी विकसित केले.

आपल्या विचारांच्या प्रचार-प्रसारासाठीच महर्षी दयानंद सरस्वतींनी १८७५ मध्ये आर्यसमाज या संघटनेची स्थापना केली. इथपर्यंतच्या सर्व प्रवासाचे मूळ कारण महाशिवरात्रीचा तो प्रसंग ! याच प्रसंगाने हा झंझावात घडवून आणण्याची प्रेरणा निर्माण केली. म्हणून **'महाशिवरात्री'** हा आर्य समाजाचाच नव्हे तर सर्व भारतीयांसाठीचा एक महत्वाचा सण आहे. हा सण **'ऋषी बोध दिन'** म्हणून साजरा करावयाचा आहे, तो इतर सणांप्रमाणे रुढी-परंपरा म्हणून नव्हे तर तो बोध घेण्यासाठी **'बोध-दिन'** म्हणून आहे...!

आजही ही आव्हाने तेवढ्याच उग्रतेने पुढे येत आहेत. जातिप्रथा, अंधश्रद्धा, मूर्तिपूजा, अवतारवाद या बाबी पुन्हा नव्या जोमाने पसरताना दिसत असल्याने आर्य समाजासाठी हे आव्हान आहे. ते पेलण्याची, त्या आव्हानांना सामोरे जाण्याची प्रेरणा घेण्यासाठी हा ऋषिबोधदिन साजरा करण्याची गरज आहे, म्हणून उठा ! पुन्हा नव्या जोमाने, ऋषिवर दयानंदांची धगधगती मशाल घेऊन..! ओम् शम् !

**-२६, 'यज्ञ' निवास,**
**इंद्रप्रस्थ गृहनिर्माण सोसायटी,**
**गजानन मंदिर परिसर, गारखेडा,**
**औरंगाबाद मो.९४२३१७८८०३**

www.thearyasamaj.org

## दयानंद जयंती निमित्त विशेष-

# महर्षी दयानन्द एक आधुनिक वैज्ञानिक

**– माधव के.देशपांडे** (मंत्री,महाराष्ट्र आ.प्र.सभा)

आज महर्षी दयानंदांविषयी, त्यांच्या चरित्राविषयी अथवा जीवना विषयी ऐतिहासिक घटना न सांगता त्यांच्या विचारसरणीतील 'आधुनिकता व वैज्ञानिकता' या विलक्षण अशा तार्किक बुद्धिमत्तेविषयी आपण विचार करु ! त्यांचे जीवनचरित्र तर तसे अनेकांना ठाऊक आहेच ! आता आपण विचार करु की दयानंदांच्या ठायी अशी कोणती विलक्षणता होती की, ज्यामुळे त्यांचे अनुयायी राजा-महाराजांपासून ते सामान्य लोकांपर्यंत सर्वजण होते. त्यात मुसलमान, ख्रिश्चन, बौद्ध, जैन, पौराणिक तर कांही संस्कृतज्ज्ञ ब्राह्मण सुद्धा होते. एवऐच नव्हे, तर त्या काळातील न्यायाधीश, जिल्हाधिकारी, पादरी सुद्धा होते. अशी कोणती विशेष बाब व विशेष आकर्षण त्यांचेजवळ होते ?

महर्षी दयानंदांची सर्वात महत्त्वपूर्ण विशेषता अशी आहे की, त्यांच्यामध्ये प्राचीनता असण्याबरोबरच आधुनिकताही होती. सर्वात प्राचीन अशा वेदावर त्यांचे संपूर्ण तत्वज्ञान आधारित आहे, असे असले तरी आधुनिक विज्ञान शिकण्यासाठी पाश्चात्य देशात जाण्याचीही ते आपल्या शिष्यांना प्रेरणा देतात. याचा प्रयोग करुन पाहू ! आम्ही दयानंदावर एवढे प्रेम का करतो? प्रत्येक मनुष्याची एक स्वाभाविक इच्छा असते की, मी नाविण्यपूर्ण दिसायला हवे. प्रत्येक वेळी कांही तरी वेगळेपणा दिसावा. वेगवेगळे नव-नवीन फॅशनचे कपडे घालावे असे का वाटते ? कारण आम्हांस आधुनिकता आवडते. आधुनिकतेचेच नाव नवीनता आहे. आम्ही आमच्या बाह्यरुपाविषयी व आधुनिकतेविषयी तर जागरुक असतोच! पण आंतरिक विचारसरणी विषयी किती प्रमाणात जागरुक असतो ? याउलट अत्यंत जुने, बिल्कुल पुराणमतवादी असतो. जसे एखादी उच्च शिक्षित व्यक्ती, रस्त्यातून एखादे मांजर जरी आडवे गेले तरी थबकते. मनात शंका येते. लग्न जुळविण्याच्या बाबतीत ग्रह, तारे, नक्षत्र, राशी, गुणमेलन करतांना दिसतात. यात आपणांस १० ते २० लाख रुपये वेतन असणाऱ्या उच्चशिक्षित अनुभवी व्यक्तीसुद्धा आढळून येतात. याचाच अर्थ असा की या सुशिक्षित लोकांच्या मनात हा प्रश्न कधीही उद्‌भवत नाही की, या जगात विज्ञानाचा नियम व कार्य-कारण सिद्धांत काम करतो, तर मग प्रत्येकाची मनोकामना पूर्ण होणे अनिवार्य आहे. हा वैज्ञानिक सिद्धांत

कोणाच्याही बुद्धीला चालना देत नाही, यांचेच आश्चर्य वाटते. नियम आणि अपवाद यामध्ये अपवाद नियमाला सिद्ध करतो अथवा नियमामुळे अपवाद सिद्ध होतो.

व्यक्ती श्रद्धेच्या अतिरेकामध्ये विज्ञान विसरते. प्रत्येक वेळी आपली बुद्धी व तर्काने विचारपूर्वक काम करण्याची युक्ती म.दयानंदांनी आम्हास दिली आहे. प्रत्येक संकटाच्या वेळी आम्ही ईश्वराची आठवण आल्यामुळे मंदिराकडे धाव घेतो. घरात चोर घुसला, तर मंदिरातील किंवा देव्हाऱ्यातील देवाला कसे कळणार ? आम्ही प्रार्थना करतो, 'हे भगवंता! माझ्या घरातील चोरास पळवून लाव. मला संकटातून वाचव. माझे रक्षण कर.' मंदिरातील देवालाच संरक्षणाची(मॅनेजर अथवा पुजाऱ्याची) गरज असते, त्यालाच आपण संरक्षणाची मागणी करतो. ज्याला इतरांच्या संरक्षणाची गरज असते, तो परमेश्वर असूच शकत नाही, हे सामान्यज्ञान आम्हांस नसते. 'जो महादेव (शिव) आपल्या अंगावर चढलेल्या उंदरास पळवून लावू शकत नाही, तो महादेव असू शकत नाही', हा विचार आम्हास ऋषी दयानंद देतात. लक्षात ठेवा त्यावेळी त्यांचे वय केवळ १४ वर्षे इतके अल्प होते.

महर्षी दयानंदांनी सर्वप्रथम हे सांगितले की, आम्ही स्वत:हूनच आपल्याच बुद्धीला कुलुप ठोकले आहे. जर एखाद्या मठ-मंदिरात, शिर्डीमध्ये अथवा अजमेरमध्ये जाऊन साऱ्या जगातील व्यक्तींचे नवस सफल होत असतील, तर 'या देशाचे भले व्हावे' अशी इच्छा बाळगणाऱ्या राष्ट्रप्रेमींचे सुद्धा मनोगत सफल व्हावयास हवे! मग त्या इच्छा का पूर्ण होत नाहीत? राष्ट्रप्रेमी म्हणतो की, 'मी माझ्या राष्ट्रातील जनतेला दहशतवादी व राष्ट्रीय शत्रूपासून वाचवू इच्छितो. सांगा माझी इच्छा पूर्ण होईल काय?' त्या ईश्वराला असे मागा की, जे या जगात इतर कोणतीही व्यक्ती ती मागणी पूर्ण करू शकत नाही. जर हा भगवंत माझी ही इच्छा पूर्ण करु शकत नसेल तर माझ्यासाठी हा ईश्वर तर बेकार आहे. हा विचार आम्हांस महर्षी दयानंद देतात.

तात्पर्य असे की, जर तुम्हास आधुनिक बनायचे असेल तर दयानंदांचा अनुयायी बनणे आवश्यक आहे. आम्हांस दयानंद आधुनिक होण्यासाठी सांगतात, तेवढे आधुनिक विचार इतरांनी कोणीही दिलेले दिसून येत नाहीत. दयानंदांच्या जीवन काळात त्यांना मानणारे कोण कोण लोक होते ? ज्या कोणांस आधुनिकता प्रिय होती, ज्यांच्या जिज्ञासांचे उत्तर दयानंदांजवळ होते, त्यांनी दयानंदांचे विचार किती ग्रहण केले ? आर्य समाज या संस्थेकडे बाह्य आकर्षण थोडेच आहे? आमचेकडे सर्वात महत्त्वाचे आकर्षण म्हणजे दयानंदांचे विचार! जे

www.thearyasamaj.org

की सरळ-सरळ आमच्या बुद्धीला चालना देतात, बुद्धी त्यांना स्वीकारते. ते सरळ हृदयास स्पर्श करतात. होय ! हे खरेच आहे. बुद्धीला पटते देखील! आमच्या बुद्धीला दयानंद चालना देतात. विचार करावयास प्रवृत्त करतात. महर्षी दयानंदांनी एक सर्वात स्वच्छ दृष्टिकोण असा आम्हास दिला की, केवळ मानण्याने प्रश्न सुटत नाहीत, जाणल्याने प्रश्न सुटतात. ज्याच्याविषयी आम्ही कांहीच जाणत नाही, त्याला मानण्यात काय अर्थ आहे ?

तुम्हास आश्चर्य वाटेल की, असे कोणते क्षेत्र आहे की, ज्याच्याविषयी ऋषी दयानंदांनी आम्हास आधुनिक विचार दिले नाहीत. दयानंदांच्या आणखी एका विषयावर आपण विचार करु ! दयानंद आम्हास वैदिक सिद्धांत समजावून सांगतात की, ज्याने अपराध केला आहे; त्यालाच दंड अथवा शिक्षा द्या. अपराध एकाने केला व दंड मात्र दुसऱ्यांना! हे होऊच शकत नाही. जी मुले अनाथ आहेत, ज्यांना समाज अवैध (अनौरस) म्हणून त्यांची अवहेलना करतो, त्यांचा काहीच दोष नाही. हा अवैध किंवा अनौरस शब्द चूक आहे. मुल अवैध, अनौरस नाही. मुलाचा जन्म ठीक-ठीक नियमानुसारच झाला आहे. अहो ! आई-वडिलांपासूनच संतती निर्माण होते. विना माता-पित्यांच्या तर त्यांचा जन्म झाला नाही ? त्याचे आई-वडील चांगलेच आहेत! तुम्ही त्यांना अवैध, अनौरस, अनाथ म्हणू शकत नाहीत. तुमच्या सामाजिक कायद्यानुसार अवैध असेल! मात्र निसर्गाच्या कायद्यानुसार नव्हे ! ऋषी दयानंद म्हणतात, 'काम-अपराध एकाने केला, तर दंड दुसऱ्याला आपण देऊ शकत नाही. ज्याने तुमच्या कायद्याचा भंग केला आहे, त्यालाच मिळाला पाहिजे. मुलाने तुमच्या कायद्याचा भंग केला नाही.' हा ऋषी दयानंदांचा बुलंद आवाज आहे. आता सांगा ही आधुनिकता आहे की पुरातनता ?

ऋषी दयांनदांविषयी आपण जेवढा विचार करु, तेवढे आपणांस कळून येईल की, या व्यक्तीने इतका विचार केलाच कसा ? आज आपणांजवळ **'सत्यार्थ प्रकाश'** उपलब्ध आहे. आपल्यासमोर वेदांचे प्रामाणिक भाष्य उपलब्ध आहेत. ऋग्वेदादिभाष्य भूमिका, ऋषी दयानंद आहेत, आर्य समाज, उपदेशक, इतके शास्त्र व ज्ञान-विज्ञान उपलब्ध आहेत, वैदिक विद्वान आहेत, तरी सुद्धा ही पौराणिकता, अवैज्ञानिकता, अंधश्रद्धा, ढोंगी, बुवाबाजी, स्वार्थी गुरु, चेले, राष्ट्रद्रोही व भ्रष्टाचारी लोक यांची दुकाने पुन्हा जोरात चालत आहे. याला आम्ही स्वतःच जवाबदार आहोत.

दयानंदांसमोर तर यापैकी कांहीच नव्हते. वेद सुद्धा सुलभतेने उपलब्ध नव्हते.

त्यांच्यासमोर कांहीच नव्हते. मग त्यांनी अशीं अत्याधुनिक विचारसरणी कशी प्रस्थापित केली ? हा विचार त्यांना सुचला तरी कसा ? त्याचे समोर कोणीही दयानंदासमान व्यक्ती नव्हती. हा अद्‌भूत विचार त्यांच्याजवळ होता.

**महर्षी दयानंदांकडे खालील तीन विलक्षण गोष्टी होत्या –**

१) ते बाल ब्रह्मचारी होते. आणि म्हणूनच सांसारिक दुर्बलतेपासून ते अलिप्त होते. कोणत्याही राजाची अथवा शासकीय अधिकाऱ्यांची त्यांना पर्वा नव्हती. त्याच्यासाठी सत्याचा शोध हेच प्रमुख कार्य होते.

२) ते संस्कृतचे इतके प्रकाण्ड पंडित होते की, पूर्वीच्या वेदभाष्यकारांच्या चुका दर्शवून त्यांचा सामना ते करु शकत होते.

३) त्यांचा संस्कृत भाषेवर व स्वत:वर एवढा जबरदस्त विश्वास होता की, त्यांना कोणत्याही पादरी अथवा परकीय व्यक्तीच्या सहकार्याची अपेक्षा नव्हती. त्यांनी फक्त संस्कृतचेच शिक्षण प्राप्त केले होते. इंग्रजीचा त्यांचेवर बाह्य प्रभाव मुळीच नव्हता. कोणत्याही शब्दाचा अर्थ जाणण्यासाठी कोणत्याही शब्दकोषाची त्यांना गरज नव्हती. त्यांच्यासाठी यास्क मुनी व पाणिनी मुनींचे कोष तत्परतेने उपलब्ध(कंठस्थ) होते.

आपण जर दयानंदांवर प्रेम करणारे असू, तर खरेच विज्ञानप्रेमी आहोत! याद्वारे आपणांस असे खात्रीपूर्वक सांगता येइल की, आम्हांस बौद्धिकताप्रिय आहे, आम्ही ईश्वरावर प्रेम करताहोत, आम्ही वेदांवर प्रेम करताहोत,आम्ही मानवतेचे पुजारी आहोत, पण यांपैकी आपण एकावर जरी प्रेम करणारे असूत, तर आपण दयानंदांवर प्रेम करणार नाही, असे होणार नाही.

म्हणून जेंव्हा आम्ही दयानंदांविषयी बोलतो, तेंव्हा आम्ही मागासलेपणाविषयी बोलत नाही. दयानंद म्हणतात- 'आधुनिकता विचारात असली पाहिजे. तरच सर्वकाही आधुनिक होईल. जर विचारच पुरातन असतील, तर मग ही बाह्य आधुनिकता काय कामाची?'

आपण ऋषी दयानंदांच्या कोणत्या कार्याचा विचार करावा! प्राण्यावर होणाऱ्या अत्याचाराचा विषय असो, वाचतांना डोळ्यात पाणी आल्यावाचून राहत नाही. '**गोकरुणानिधी**' हे छोटेसे पुस्तक वाचा! असे वाटते की दयानंद साऱ्या पशूंचे वकीलच आहेत. इथे त्यांनी ईश्वरावर सुद्धा राग काढला आहे. ते म्हणतात कसे – '**काय तुझ्या न्यायाचे दरवाजे बंद झालेत काय ? काय या प्राण्यांची केविलवाणी हाक तुझ्या कानावर येत नाही ?**' इतकी सहानुभूती, इतकी

संवेदना, इतकी सहृदयता, इतकी करुणा दयानंदाशिवाय (स्वनामधन्य) कुठे मिळेल?

महर्षी दयानंदांचें कोणतेही कार्यक्षेत्र घ्या! विद्वत्ता पाहा, दया पाहा, उदारता पाहा! भारतवर्षात ऋषी दयानंदांनी कोणते कार्य केले असेल, तर आम्हांस आमचा आत्मसन्मान मिळवून दिला! जर काय कोणी आर्य समाजाशी जोडला गेला असेल, आत्मसन्मान विरहीत झाला असेल, तर तो दयानंदांचा अनुयायी होऊच शकत नाही! दयांनदांचा अनुयायी गरीब असू शकतो.तो मागे राहू शकतो, परंतु आत्महीन असूच शकत नाही.

आमचे शत्रुत्व फक्त वाईटपणाशी असू शकते.आमचे शत्रुत्व मनुष्याशी नाही, अज्ञानतेशी नाही, त्याच्या गरीबीशी नाही. गरीब आहे, परंतु गरीब असणे हा काही अपराध नव्हे! जोपर्यंत त्याचा बलवान साथी ईश्वर त्याचेजवळ आहे, तोपर्यंत तो दुर्बल असू शकत नाही. आमच्या जुन्या पिढीने ज्यामुळे आर्य समाजाला व दयानंदांला स्वीकारले होते, काय ती कारणे आज नाहिशी झाली आहेत ? जर आज ती कारणे दिसत नसतील तर आमचीच कांही तरी कमतरता असली पाहिजे. आम्ही विचारांपासून व सिद्धांतांपासून दूर जात आहोत. आम्हांस असे सांगण्यात येत आहे की, सिद्धांतांविषयी एवढा आग्रह धरु नका! नाही तर लोक दूर जातील. काय हेच सिद्धांत म.दयानंदांच्या वेळी आड येत होते ? नाही, पुन्हा हे सर्व जोमाने प्रकट होत आंहेत, कारण समाजात त्याला खत पाणी मिळत आहे. आज पुन्हा एकदा दयानंदांच्या कार्याची दृढतेने पूर्तता करण्याची गरज निर्माण झाली आहे. महर्षी दयानंद जयंतीनिमित्त आपणां सर्वांना त्यांचे विचार आत्मसात करण्याची शक्ती लाभो, ही कामना ! जयंती दिनानिमित्त या थोर विश्ववंद्य महापुरुषास श्रद्धापूर्वक अभिवादन ! धन्यवाद !

**– रो हाऊस नं.३, साई अव्हेन्यू, कुणाल आयकॉन समोर,पिंपळे–सौदागर, पुणे–२७**

**मो.९८२२२९५५४५**

## आकाशवाणीवर प्रवचने

वैदिक गर्जना मासिकाचे संपादक डॉ.नयनकुमार आचार्य यांची परभणी आकाशवाणी केंद्रावरुन येत्या २१, २२, २३ व २४ फेब्रुवारी रोजी आध्यात्मिक विषयावर लघुप्रवचने प्रसारित होणार आहेत. दररोज सकाळी ५.५५ वा. ''विचारशलाका'' या चिंतनपर कार्यक्रमांतर्गत ते मौलिक विचार मांडणार आहेत. वैदिक सिद्धांताचा आधार घेत माणूस, विद्यार्थी, सद्व्यवहार, ज्ञानमहिमा या विषयाबरील माहिती सादर होणार आहे. वरील लघुप्रवचनांचे ध्वनिमुद्रण परभणीच्या आकाशवाणी केंद्रातील प्रसारण विभागात नुकतेच पार पडले. तरी श्रोत्यांनी या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा.

www.thearyasamaj.org

(वार्ता विशेष)

# परळी परिसरात विद्यार्थ्यांसाठी ज्ञानप्रबोधन

'राष्ट्राचे उज्ज्वल भवितव्य तरुण, विद्यार्थी व बालकांच्या हाती आहे. यासाठी शाळा-महाविद्यालयातून त्यांना सुस्कारांचे व्यासपीठ उघडून त्यांच्या अंगी मानवीय मूल्यांचे तत्त्वज्ञान रुजविण्यासाठी व्यापक प्रयत्न व्हावेत व विद्यार्थ्यांनीही वेदाधारित जीवनमूल्यांना धारण करावे,' असे आवाहन प्रांतीय सभेचे वेदप्रचार अधिष्ठाता श्री लक्ष्मणराव आर्य गुरुजी यांनी केले.

सभेच्या सहकार्याने आर्य समाज परळीच्या वतीने ग्रामीण भागातील विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी आयोजित जीवनसंस्कार वैदिक व्याख्यानमालेत श्री आर्य बोलत होते. त्यांचे सोबत सभेचे भजनोपदेशक पं.प्रतापसिंह आर्य व डॉ.नयनकुमार आचार्य हे ही या व्याख्यानमालेत मार्गदर्शक म्हणून सहभागी होते. या तिन्ही विद्वान उपदेशकांनी परळी तालुका व त्यालगतच्या सोनपेठ तालुक्यातील कांही शाळांमध्ये विद्यार्थ्यांशी संवाद साधला व जीवनोपयोगी मूल्यांवर प्रभावी शब्दात मार्गदर्शन केले. ज्या शाळांमध्ये कार्यक्रम संपन्न झाले, त्यात नंदागौळ येथील श्री भगवानबाबा विद्यालय, टोकवाडी येथील श्री रत्नेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जिरेवाडी येथील सोमेश्वर विद्यालय, बँक कॉलनी परळीतील शारदा विद्यामंदिर, उखळी बु. येथील श्री केदारेश्वर विद्यालय, नंदनज येथील केदारी महाराज विद्यालय, नैकोटा येथील माध्यमिक विद्यालय व आवलगाव येथील कीर्तीश्वर विद्यालयांचा समावेश होता. हा प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल महाराष्ट्र आर्य प्रतिनिधी सभेने वरील शाळांचे व विद्वानांचे आभार मानले आहेत.

# सोलापुरात श्रद्धानंद बलिदान दिवस साजरा

सोलापुर येथील आर्य समाजात दि.२५ डिसेंबर २०१६ रोजी आर्य समाजाचे प्रख्यात तपस्वी क्रांतिकारी नेते व गुरुकुल शिक्षण पद्धतीचे अध्वर्यू अमर बलिदानी हु.स्वामी श्रद्धानंद सरस्वती यांचा ९०वा बलिदान दिवस प्रबोधनपर कार्यक्रमानी साजरा करण्यात आला. प्रारंभी पं.वेदसुमन आर्य(भोसले) यांच्या ब्रह्मत्वाखाली **'महापुरुष प्रशंसन'** यज्ञ संपन्न झाला. त्यानंतर श्री रमेश बिडला यांनी सुमधुर भजन सादर केले. याप्रसंगी पं.राजवीरजी शास्त्री यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून स्वामी श्रद्धानंदांच्या क्रांतिकारी जीवन व कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी

ते म्हणाले - '**मुन्शीराम ते महात्मा**' हा जीवनपट ऐतिहासिक स्वरुपाचा असून 'सत्संग, प्रयत्न आणि आत्मबळाच्या जोरावर माणूस जीवनात किती मोठे कार्य करु शकतो ? याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे स्वामी श्रद्धानंद होय'. ते पुढे म्हणाले, 'स्वामीजींची महर्षी दयानंद, आर्य समाज, वैदिक सिद्धांतांवर त्यांची अगाध श्रद्धा होती. वैदिक धर्माच्या रक्षणासाठी त्यांनी सर्वस्व समर्पिले. सार्वदेशिक सभेची संगठन वृद्धी, गुरुकुल कांगडीची स्थापना, ब्रिटिशांशी दिलेला लढा, कॉंग्रेसचे कार्य, शुद्धी आंदोलन इत्यादी कार्यातील त्यांचे योगदान फारच प्रेरक आहे.'याप्रसंगी आर्य समाजाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## २२ ते २६ फेब्रु.दरम्यान परळीत 'वेदज्ञान कथा यज्ञ'

महान् क्रांतिकारी वेदोद्धारक युगपुरुष महर्षी स्वामी दयानंद सरस्वती यांचा जन्मदिवस व ऋषिबोधोत्सव परळी येथील आर्य समाजात विविध प्रबोधनपर कार्यक्रमांनी साजरा होत आहे. दोडिया परिवार व आर्य समाजाच्या वतीने दि.२२ ते २६ फेब्रुवारी २०१७ या दरम्यान होणाऱ्या '**वेदज्ञान कथा यज्ञा**'साठी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे वैदिक प्रवक्ते व ओजस्वी विद्वान आचार्य श्री आनंद पुरुषार्थी (होशंगाबाद म.प्र.) आणि प्रसिद्ध आर्य भजनोपदेशक पं.अजय आर्य (मेरठ-उ.प्र.) यांना आमंत्रित करण्यात आले आहे. या उद्बोधक व प्रेरणादायी कार्यक्रमाची तयारी मोठ्या प्रमाणात केली जात आहे.

दररोज सकाळी ७.३० ते ११ वा. पर्यंत चालणाऱ्या सकाळच्या सत्रात वेदपरायण यज्ञ, मौलिक भजनसंगीत आणि आध्यात्मिक व धार्मिक विषयांवर प्रवचनेतर दुपारी ४ ते ५ दरम्यान विद्यार्थी, युवक आणि महिलांसाठी शंकासमाधान आणि रात्री ८ ते ११ वाजेपर्यंत गीत-भजन व राष्ट्रीय, सामाजिक व जागतिक पातळीवर निर्माण होणाऱ्या विविध समस्यांवर प्रखर उपाययोजना आदी विषयांवर व्याख्यानाचे आयोजन होत आहे. 'मानवी जीवनात दुःख उत्पन्न होण्याची कारणे, शांती, सुख-समाधान व आनंद प्राप्तीचे वैदिक मार्ग, वैश्विक समस्यांवर वेदज्ञान-एकमेव उपाय' आदी विषयांवर या कार्यक्रमात मार्गदर्शन होणार आहे. तरी या कार्यक्रमास सर्व बंधु-भगिनींनी बहुसंख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकातर्फे करण्यात आले आहे.

www.thearyasamaj.org

# ज्ञानकुमारजींचा प्रेरणादायी वाढदिवस

कोणत्याही प्रकारचा गाजावाजा न करता व कार्यक्रमांचे आयोजन न करता लातूरच्या रामनगर आर्य समाजाचे मंत्री श्री ज्ञानकुमारजी आर्य यांनी आपल्या ७५ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून विविध सामाजिक व धार्मिक संस्थांना ७५ हजार रुपयांचे दान केले व नव्या पीढीसमोर दातृत्वाचा आदर्श निर्माण केला आहे.

श्री आर्य हे निवृत्त शिक्षक असून त्यांनी राज्य पाठ्यक्रमिक मंडळावर अभ्यासक म्हणून कार्य केले आहे. तसेच लेखक, वेदप्रचारक, प्रकाशक, साहित्य संशोधक, सामाजिक कार्यकर्ता व आर्य समाजाचे सक्रिय पदाधिकारी म्हणून बजावत असलेली त्यांची कामगिरी स्तुत्य अशी आहे. महर्षी दयानंदांचे निष्ठावंत अनुयायी व आर्य समाजाचे सिद्धांतानुगामी व्यक्तिमत्व त्यांची ओळख आहे. वैदिक विचारांच्या प्रचार व प्रसारांसाठी सतत धडपडत असलेल्या श्री आर्य यांनी ३१ डिसेंबर २०१६ रोजी आपल्या वयाची ७५ वर्षे पूर्ण केली, तर येत्या जून २०१७ मध्ये वैवाहिक जीवनाची ५० वर्षे पूर्ण करत आहेत. आपल्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त तर विवाहाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त त्यांनी खालील संस्थांना ७५ हजार रुपयांचे दान करुन वाढदिवस साजरे करण्याची नवी परंपरा सुरु केली आहे. त्यांनी महाराष्ट्र सभा, आर्य समाज नेपाळ, गुरुकुल केहलारी व बिबराळ, बोटकूळ आणि संभाजीनगर या आर्य समाजांना दान दिले आहे. यानिमित्त श्री ज्ञानकुमारजी आर्य यांचे अभिनंदन!

शोकवार्ता

## संजय आर्य काळाच्या पडद्याआड



वैदिक साहित्य मोठ्या प्रमाणात मराठी भाषेत आणणारे आर्य प्रकाशक व पिंपरी(पुणे) आर्य समाजाचे तरुण तडफदार सक्रिय कार्यकर्ते श्री संजय प्रभाकर आर्य यांचे शुक्रवार दि.३ फेब्रुवारी रोजी रात्री १० वा. च्या सुमारास हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले. मृत्युसमयी ते ५७ वर्षे वयाचे होते. त्यांच्या पश्चात आई सौ.पुष्पादेवी, वडील श्री प्रभाकरराव, पत्नी सौ.अलका, दोन मुले चि.सागर व चि.आदित्य, दोन भाऊ श्री सुनिल व श्री मिलिंद असा परिवार आहे. आर्य समाजाच्या प्रचार–प्रसार कार्यात

www.thearyasamaj.org

व मराठी आर्य वाङ्मय प्रकाशन कार्यात मोठी मोलाची भूमिका बजावणाऱ्या या उत्साही युवा कार्यकर्त्याच्या अकाली निधनाने महाराष्ट्रातील आर्य समाज चळवळीला मोठा जबरदस्त हादरा बसला असून समाजातील धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रासह आर्य समाज संस्थेची अपरिमित हानी झाली आहे. श्री आर्य सॉरगेट पुणे परिसरातील महात्मा फुले महाविद्यालयात अंशकालीन प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. आर्य समाज पिंपरीचे अंतरंग सदस्य होते. या संस्थेतर्फे चालविण्यात येणाऱ्या साहित्य प्रकाशन विभागात त्यांचे सर्वाधिक योगदान होते. स्वत:च्या मालकीच्या 'आर्य प्रिन्टर्स'च्या माध्यमाने ते मराठी ग्रंथाचे प्रकाशन करीत असत. आर्यवीर दलाच्या शिबिर आयोजनात त्यांनी मोठी भूमिका बजावली. इंग्रजी विषयात एम.ए. केल्यानंतर त्यांनी वृत्तपत्र विद्या शाखेतून एम.ए. केले व पत्रकारिता आणि प्रकाशन क्षेत्राकडे वळले. दै.लोकमत व दै.तरुण भारत या वृत्तपत्राचे ते वरिष्ठ पत्रकार ही होते. 'हिंदू स्वाभिमान प्रतिष्ठाण' या धार्मिक संस्थेचे ही ते सक्रिय कार्यकर्ते होते.

मूळचे नगर जिल्ह्यातील श्री संजयजी यांचे कुटूंबिय गेल्या दोन पिढ्यांपासून पुण्यात स्थायिक आहेत. साधारणत: १९८३ साली पं.विश्वनाथ शास्त्री यांच्या प्रेरणेने श्री संजयजी हे आर्य विचारांकडे वळले. आज त्यांचा संपूर्ण परिवार आर्य तत्त्वांवर चालणारा आहे. स्व.प्रा.एकनाथ नाणेकर यांचे घनिष्ठ वर्गमित्र व जिवाभावाचे सोबती म्हणून श्री संजयजी ओळखले जात. दुर्दैवाने नाणेकरांच्या मृत्यूच्या ८ वर्षानंतर हृदयविकारानेच हाही मित्र जगातून निघून गेला. मितभाषी, सुस्वभावी, उद्यमी, मनमिळाऊ आणि कार्य करण्याची आंतरिक तळमळ असलेल्या श्री संजय आर्य यांच्या आकस्मिक निधनाने मराठभ आर्यविश्वात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

त्यांच्या पार्थिवावर दुसऱ्या दिवशी सकाळी ११ वा. सुमारास अत्यंत शोकाकूल वातावरणात पुण्याच्या रुपीनगर निगडी भागातील अमरजाई स्मशानभूमीत पूर्ण वैदिक पद्धतीने अंतिम संस्कार करण्यात आले. आर्यपुरोहित सर्वश्री पं.विश्वनाथजी शास्त्री, हेमंत आर्य, विवेक आर्य यांनी हा अंत्यविधी पार पाडला.

याप्रसंगी प्रांतीय सभेचे मंत्री माधवराव देशपांडे व पं.विश्वनाथ शास्त्री यांनी प्रातिनिधीक स्वरुपात सर्वांच्या वतीने श्रद्धांजली वाहिली. यावेळी आर्य समाज पिंपरीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

**दिवंगत आत्म्यास प्रांतीय सभा व आर्य समाजांतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली !**

www.thearyasamaj.org

# -ο राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा का पुरस्कार वितरण ο-



हदगांव में आयोजित स्व.बिराजदार स्मृति विद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा में प्रथम पुरस्कार प्राप्त कु.साक्षी पाईकराव को पुरस्कृत करते हुए सर्वश्री प्रभाकररावजी देशमुख, आर्यमुनिजी, स्वा.सै.हळदे, शिंदे, कदम आदि।



द्वितीय पुरस्कार प्राप्त कु.वैष्णवी वाघमारे को पुरस्कृत करते हुए आर्य समाज के पदाधिकारी गण ।



सोलापूर में आयोजित मल्लीनाथ बिराजदार गौरव वक्तृत्त्व स्पर्धा में विजेता छात्रों के साथ आर्य समाज के पदाधिकारी ।

www.thearyasamaj.org




परिवारों के प्रति सच्ची निष्ठा,
सेहत के पति जागरुकता
शुदधता एवं गुणवत्ता, करोडों
परिवारों का विश्वास, यह है
एम.डी.एच.का इतिहास जो
पिछले ९३ वर्षों से हर कसौटी
पर खरे उतरे हैं - जिनका कोई
विकल्प नहीं। जी हां यही हैं
आपकी सेहत के रखवाले

MDH
मसाले
असली मसाले
सच-सच

MAHASHIAN DI HATTI LTD.
Regd.Office : MDH House,
9/44 Kirti Nagar, New Delhi-110015,
Ph : 25939609,. 25937987
Fax : 011-25927710
E-mail : mdhltd@vsnl.net
Website : www.mdhspices.com




लाजवाब खाना !
एम.डी.एच. मसाले
हैं ना !



आर्य जगत के दानवीर भामाशाह
महर्षि दयानन्द के अनन्य भक्त
महाशय धर्मपालजी





REG.No.MAHBIL/2007/7493*Postal No.L/Beed/18/2015-17

सेवा में,
श्री

प्रेषक -
मन्त्री, महाराष्ट्र आर्य प्रतिनिधि सभा,
आर्य समाज, परली-वैजनाथ
पिन ४३१ ५१५ जि.बीड (महाराष्ट्र)

यह मासिक पत्र सम्पादक व प्रकाशक श्री मन्त्री, महाराष्ट्र आर्य प्रतिनिधि सभा द्वारा वैदिक प्रिंटर्स, परली वैजनाथ इस स्थलपर मुद्रित कर 'महाराष्ट्र आर्य प्रतिनिधि सभा' के संपर्क कार्यालय 'आर्य समाज, परली वैजनाथ ४३१ ५१५ जि.बीड (महाराष्ट्र)' इस स्थान से प्रकाशित किया।


श्रमशील किसान,
सरल, धार्मिक, श्रद्धालू,
सेवाभावी एवं
सुस्वभावी व्यक्तित्व तथा
अपने पुत्र व कन्याओं
को सुसंस्कारित
करनेवाले आदर्श पिता





स्व.श्री रंगनाथ सीतारामजी जाधव
भावपूर्ण श्रद्धांजली !

डी.टी.पी.
जॉबवर्क के लिए
उपयुक्त स्थान



उत्कृष्ट डिझाइनों में सब प्रकार की रंगीन छपाई के कार्य
अल्प दरो में समय पर किये जानेवाला मराठवाडा का प्रसिद्ध मुद्रण स्थान
भारत ऑफसेट प्रिंटर्स
स्टेशन रोड, परली-वैजनाथ जि.बीड- ४३१ ५१५
* मुख्य संचालक *
श्री हनुमान रंगनाथरावजी जाधव
Mob.9422592579 / E-mail : bharatoffsetparli12@gmail.com
इनकी ओर से वैदिक गर्जना मासिक का रंगीन मुखपृष्ठ सस्नेह भेंट !